# प्रेस नोट

वारजे वाहतुक पोलीसांनी सुमारे ०८ महिने पासुन दुचाकी वाहनावर बनावट क्रमांक टाकुन वापरत असलेले दुचाकी वाहन हे आरोपीसह घेतले ताब्यात.

---

सदर बाबत अधिक माहिती अशी की, सुरक्षा पंधरवडा २०१८ कार्यक्रमाचे चे अनुशंगाने वारजे वाहतूक विभागात दिनांक ०३/०५/२०१८ चांदणी चौक येथे पोउनि श्री. सुबराव लाड, पो.हवा.तानाजी नांगरे, पो.ना. अविनाश गोपनर, पो.ना. किरण पवार, पो.ना.रविंद्र अहिरे, पो.शि.योगेश वाघ, पो.शि.सुजय पवार हे विशेष कारवाई करीत असतांना त्यांना एक अल्पवयीन मुलगा ॲक्टीवा चालवत असतांना मिळून आल्याने त्यास थांबवून त्याचेकडे त्याचे नाव पत्ता व वय विचारता त्याने आपले नाव विधी संघर्षीत बालक, वय १४ वर्ष रा.सर्वोदत्त कॉलेज समोर संतोष दगडे चाळ, रुम नं.४ पाटील नगर बावधान बु।। पुणे व मुळ गाव बावधन ता.वाई जि.सातारा असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर त्याचेकडे लायसन्स व गाडीचे कादपत्राबाबत विचारणा केली असता त्याने ती नसल्याचे सांगीतले. त्यामुळे सदरची गाडी अधिक चौकशी कामी मो.व्हे.कायदा कलम २०७ अन्वये नोटीस अदा करुन ताब्यात घेऊन चौकशी केली असता सदरच्या गाडीचा नंबर बनावट असल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे इसम नामे १. धनंजय हनुमंत बनसोडे रा.सर्वोदत्त कॉलेज समोर संतोष दगडे चाळ, रुम नं.४ पाटील नगर बावधान बु।। पुणे व मुळ गाव बावधन ता.वाई जि.सातारा २. करण हनमंत बनसोडे रा.सदर व ३. विधीसंर्षीत बालक वय १४ वर्ष रा.सदर यांनी संगनमताने त्यांचे ताब्यातील ॲक्टीवा गाडी इंजिन नं.जेएफ ५०ईयु५४५२३४० (JF50EU5452340) चेसी नं.एमई४जेएफ५०७जएचयु४५२४४२ (ME4J F507GHU452442) हिची मा.प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचकडे नोंदनी न करता तीचेवर एमएच/१२/पीआर/०७८९ हा बनावट क्रमांक टाकून शासनाची फसवणूक करुन काहीतरी गंभिरस्वरुपाचा दखलपात्र गुन्हा करण्याचे इराद्याने सुमारे ०८ महिने पासुन वापरत आहेत, तसेच अल्पवयीन मुलास सदरचे वाहन चालविण्यास दिले म्हणून अ.क्र.१,२ व ३ यांचे विरुध्द वारजे पोलीस ठाणे येथे गुरन १५५/२०१८ भारतीय दंड संहिता कलम ४२०,३४ व मोटार वाहन कायदा कलम ४(१)१८१, ५/१८०,३९/१९२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अधिक तपास पोउनि श्री. ए.व्ही.कदम वारजे पोलीस ठाणे हे करीत असुन त्यांचेकडुन अधिक गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, सहा. पोलीस आयुक्त, परि. ०१, वाहतुक शाखा, पुणे शहर , सहा. पोलीस निरीक्षक , वारजे वाहतुक विभाग, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पोउनि श्री. सुबराव लाड, पो.हवा तानाजी नांगरे, पो.ना.अविनाश गोपनर, पो.ना. किरण पवार, पो.ना.रविंद्र अहिरे, पो.शि. योगेश वाघ, पो.शि. सुजय पवार यांनी केली.